# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## विद्यापीठाने निर्मिती केलेले सुधारीत व संकरीत वाणाबद्दल सर्व समावेशक व सविस्तर माहिती

| अ.क्र. | तपशील | | सविस्तर माहिती |
|---|---|---|---|
| १ | पीक/वाणाचे नाव | | **बाजरी : एआयएमपी-९२९०१ (समृध्दी)** |
| २ | प्रसारीत केल्याचे वर्ष | | १९९८ |
| ३ | प्रसारीत करणारी संस्था/विद्यापीठ | | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी |
| ४ | जमीन | | मध्यम ते हलकी जमीन |
| ५ | हवामान | | खरीप हंगामात |
| ६ | पेरणी/लागवडीचा कालावधी | | जोडओळीवर ४५ X १५ सेंमी / पेरणीयोग्य पाऊस पडल्यानंतर जुलैच्या पहिल्या पंधरवाडयापर्यंत |
| ७ | प्रती एकर बियाणे | | १ ते १.५ किलो |
| ८ | पीक व्यवस्थापन | | |
| | १ | लागवडीचे/पेरणीचे व्यवस्थापन | खोल नांगरणी करून वखराच्या दोन पाळया देवून जमीन सपाट, भुसभुशीत करून २ सेंमी खोलीवर बियाणाची पेरणी करावी, जास्त खोलीवर पेरणी करु नये |
| | २ | खत व्यवस्थापन | ७ गाडया शेणखत प्रती हेक्टरी टाकावे, पेरणीवेळी नत्र, स्फुरद व पालाश अनुक्रमे ३०:३०:३० किग्रॅ/हे. प्रमाणे टाकावे व पेरणी नंतर १ महिन्यानी नत्र ३० किग्रॅ प्रती हेक्टरी देण्यात यावे. |
| | ३ | पाणी व्यवस्थापन | ३ ते ४ आठवडे पावसाचा ताण पडल्यास संरक्षित पाणी दयावे. संरक्षित पाणी पिकाच्या वाढीच्या अवस्थेत, फुटव्याच्या अवस्थेत व दाणे भरण्याच्या अवस्थेत पाणी दयावे. |
| | ४ | कीड व्यवस्थापन | बाजरीवर **हिंगे अथवा भुंगे, सिटोनिड** भुंग्यासाठी सदरील भुंगे जमा करून रॉकेलमिश्रित पाण्यात टाकून नाश करावा, प्रकाश सापळयाचा उपयोग करावा, मोसमी पाऊस सुरू होण्यापूर्वी शेताची व बांधाची स्वच्छता करून मिथील पॅराथिऑन २ टक्के भुकटी अथवा एन्डोसल्फान ४ टक्के भुकटी २० किग्रॅ / हेक्टरी धुरळणी करावी. **खोडकीडीसाठी** कीड लागलेले पोंगे वेळोवेळी काढून जाळून टाकावीत, प्रादुर्भाव दिसून आल्यानंतर एन्डोसल्फान ३५ टक्के प्रवाही ३०० मिली पाण्यात अथवा एन्डोस्ल्फान ४ टक्के दाणेदार प्रती हेक्टरी पोंग्यात टाकावे. पहिली उपयायोजना उगवणीनंतर २५ दिवसांनी करावी, **केसाळ अळी चा** प्रादुर्भाव दिसून आल्यास कणसावर एन्डोसल्फान ४ टक्के भुकटी २० किग्रॅ/ हेक्टरी धुरळावी. |
| | ५ | रोग व्यवस्थापन | **केवडा/ गोसावी** : या रोगाचे प्रतीकारक वाण वापरल्यास आणि वाढ व पिकाची फेरपालट केल्यास या रोगापासून बचाव होतो. तरी पण रासायनिक नियंत्रणासाठी ॲप्रॉन ३५ टक्के प्रवाही @ बिजप्रक्रिया करूनच पेरणी करावी. **अरगट/ कणसावरील चिकटा** : या रोगाच्या प्रतीबंधासाठी २० टक्के मिठाच्या द्रावणात बियाणे टाकून तरंगणारे बी काढून नाश करावे व तळाशी राहिलेले बी पेरण्यास वापरावे, कणीस निसत असताना बावीस्टीन ०.१ टक्के बुरशीनाशकाची फवारणी करावी. |
| ९ | पिकाचा कालावधी | | ८० ते ८५ दिवस |

| | | |
|---|---|---|
| **१०** | **उत्पादकता** | धान्य : २० ते २५ क्विंटल<br>कडबा : ३५ ते ४० क्विंटल |
| **११** | **वाणाची वैशिष्ट्ये/विशेष गुणधर्म** | १. हा वाण मध्यम उंचीचा म्हणजे १५०-२०० सेंमी असून गोसावी रोग प्रतीकारक आहे.<br>२. दाण्याचा रंग हिरवट असून १००० दाण्याचे वजन १४ ते १६ ग्रॅम आहे.<br>३. सरळवाण असल्याने याचे बियाणे सतत तीन वर्षे पेरणीसाठी वापरता येते.<br>४. भाकरीची गुणवत्ता उत्तम आहे. |
| **१२** | **वाणासंबंधीचे छायाचित्रे** |  |